१५६

1698

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ६९८ (८३८)

ग्रंथ नाम गोपी माहात्म्य.

विषय माहात्म्य.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

मराठी- महात्म्य.
६५९३/१

# ॥ श्रीतापीमहात्म्यग्रंथ ॥

ही पोथी श्री- रावजी बाळकृष्ण उपासनी
खानदेशवैभव प्रेसचे मालक यांनीं दिली आहे ता
१३-८-१९४१

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

1

# ॥ अथश्रीतापीमाहात्म्यग्रंथप्रारंभः ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकुळदेवतायैनमः । श्रीगुरुदत्तात्रेयायनमः । श्रीसद्गुरुचिदानंदायनमः । श्री आनंद । श्रीतापीमाताकीजय ॥ ॐनमोजी गणनायका । सकळसिद्धिप्रदायका । कविजन प्रतिपाळका । विघ्नेश्वरा नमनमाझें ॥ १ ॥ नमोजी एकदंता । गौरीहराचीया सुता । तुझें चरणावरी माथा । ठेऊनिया विनवितों ॥ २ ॥ जयजयाजी गणाधीशा । ज्ञानदीप स्वयंप्रकाशा । हृदयकमळ विकाशा । शंभूपुत्रा ॥ ॥ ३ ॥ नमनकरूं सरस्वती । आदिशक्ति वेदमूर्ती । कवित्व करावया देईं मती । मज कारणें ॥ ४ ॥ मग संतोषळी शारदा । बोलिली ती वरदा । ग्रंथ करीं रे विनोदा । तापीमहात्म्य ॥ ५ ॥ आतां वंदूं श्रीगुरुनाथा । चरणीं ठेऊनि माथा । तेणें मस्तकीं ठेविले वरदहस्त । कृपाळूपणें ॥ ६ ॥ श्रीगुरुराज वंदिला । तो मज प्रसन्न जाळा । अभय वर दिधला । तापी महात्म्य करावयासी ॥ ७ ॥ विंध्यवासीनी कुळदेवता । तीतें नमन करूं आतां । तापीमहात्म्य वर्णितां । प्रसन्न होईं मज ॥ ८ ॥ आतां हे अलोलिक कथा । श्रोतीं परिसावी सर्वथा । जेणें भवबंधन व्यथा । तुटे संसाराची ॥ ९ ॥ हीं एकवीस कल्पांची माता । ब्रह्मादिकीं वंदिळी समस्त सरितादेवतां । इचा महीमा वर्णितां । पार नाहीं ॥ १० ॥ तरी तापीचें महिमान । प्राकृत भाषेंत मी वर्णीन । संस्कृतीं असे जें व्यासवचन । तेंच मी सांगतों ॥ ॥ ११ ॥ पूर्वपश्चिम समुद्र पवित्र केले । तापी तटीं त्र्यैलोक्य शोभविलें । अनेक जन्मांचे पापदहन करी वहिलें । त्र्यैलोक्य तापी पवित्र करी ॥ १२ ॥ कृतायुगीं सेविळी ब्रम्ह्यानें । त्रेतायुगीं सेविळी दशरथनंदनें । द्वापारीं हळायुध कृष्णें । सूर्यनंदिनी सर्वा वंद्य ॥ १३ ॥ सकळ देवासहित स्वामी

project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

कार्तिक । बैसले कैलास शिखरीं सम्यक । तेथें भानुजा महात्म्य ऐक । सांगितलें श्रीशंभुदेवें ॥ १४ ॥ ती कथा लोमहर्षणें ऐकिली । तेणें गोकर्णाप्रति निवेदिली । गोकर्णें ऋषींलागीं कथन केली । द्वापारांती भूतळीं ॥ १५ ॥ हें अपूर्व ऐकोनी । सर्व रोमांचित होऊनि । गोकर्णासी आदरें करूनी । पुसते जाले ॥ १६ ॥ ॥ मुनयऊचुः ॥ मुनींनीं गोकर्णासी विचारिलें । इचें उभयतटाकीं तीर्थवृंद विस्तारिलें । तें सांगाजी वहिलें । संक्षेपेंसी ॥ १७ ॥ ॥ गोकर्णउवाच ॥ सकळ मुनी हो ऐकावें । तापी उभय तटीं लिंगांची नांवें । तिंहीं महापापातें हरण करावें । दर्शनमात्रें ॥ १८ ॥ धर्म क्षेत्रींचा धर्मेश । तापस क्षेत्रींचा तपनेश । गोकर्णींचा सिद्धनागेश । पार्वतीवनाचा महेश ऐका तुह्मीं ॥ १९ ॥ च्यवन-क्षेत्रीं सुजातेश्वर । मुनिक्षेत्रीं निष्कलंकेश्वर । तेथें दुसरा पंचाशिखेश्वर । पुरुरवाक्षेत्रीं नरवाहनेश्वर असे देखा ॥ २० ॥ बालक्षेत्रीं बाळलिंग । त्याचा आकार पुष्पपराग । श्रावणक्षेत्रीं अंधक लिंग । कंकोळा संगमीं क्रोडेश्वर ॥ २१ ॥ पांचाळक्षेत्रीं पुंडरीकेश्वर । जामिनक्षेत्रीं हरिश्चंद्रेश्वर । विश्वामित्रक्षेत्रीं भरतेश्वर । वि-रोचनक्षेत्रीं वैरोचनेश्वर सत्य जाणा ॥ २२ ॥ तेथें दुसरा कंकालकुटेश्वर । तेचस्थानीं गांधारेश्वर । वन्ही-क्षेत्रीं अर्बुदेश्वर । असे आणि कनलेश्वर तये स्थानीं ॥ २३ ॥ त्यानंतरे कर्कोटकेश्वर । त्याउपरी धुंधुमारे-श्वर । आणि हयग्रीवेश्वर । पद्मकोशेश्वर त्यानंतर ॥ २४ ॥ खद्योतक्षेत्रीं कार्तवीर्येश्वर । कुब्जकक्षेत्रीं श्रीकंठेश्वर । किन्नरक्षेत्रीं सुकंठेश्वर । चंद्रचूडेश्वर भृगुक्षेत्रीं ॥ २५ ॥ तेथें आणिक पशुपतेश्वर । तेथेंच असें उग्रेश्वर । आणि मदनांतकेश्वर । तारकेश्वर तारकक्षेत्रीं ॥ २६ ॥ शशिभूषणक्षेत्रीं हंसेश्वर ।





Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

वसिष्टमुनिक्षेत्रीं मुचकुंदेश्वर । तेथें आणिक कुंतळेश्वर । बुद्धेश्वर विमळेश्वर तो ॥ २७ ॥ कुत्समुनीक्षेत्रीं कमलेश्वर । तेथें आणिक नीळकंठेश्वर । हळाहळाचा आहार । केळा जेणें ॥ २८ ॥ अरुंधती वनीं शांतेश्वर । कुंजरेश्वरक्षेत्रीं त्र्यंबकेश्वर । तेथें आणिक पुष्करेश्वर । दुर्वासेश्वर आणि लक्ष्मीश्वर जाणा ॥ २९ ॥ तेथें आणिक जामदग्न्येश्वर । तेथेंच आशाप्रद्योतनेश्वर । त्याहून पुर्वीवामनेश्वर । सुंदरेश्वर सुंदरक्षेत्रीं ॥ ३० ॥ राघवक्षेत्रीं रामेश्वर । सनंदनक्षेत्रीं मृकंडेश्वर । सिद्धमुनिक्षेत्रीं उष्णापगेश्वर । उच्चैश्रवेश्वर युग्मक्षेत्रीं ॥ ३१ ॥ नंदकक्षेत्रीं नंदिकेश्वर । जो सकळांचा पापहर । तेथें सिद्धिप्रदेश्वर । जाणावा सिद्धाचळीं ॥ ३२ ॥ नारदक्षेत्रीं स्थालेश्वर । ब्रह्मप्रकाशक्षेत्रीं सिद्धेश्वर । मतंगमुनिक्षेत्रीं गंगेश्वर । अर्जुनेश्वर पार्थक्षेत्रीं ॥ ३३ ॥ युधिष्टिरक्षेत्रीं श्रीकरेश्वर । अंबिकाक्षेत्रीं आंबिकेश्वर । जो महामोहा टाळणार । प्रसिद्ध जाणा ॥ ३४ ॥ कृष्णक्षेत्रीं कल्मषापहेश्वर श्रीमुखक्षेत्रीं आमर्दकेश्वर । चतुर्भुजक्षेत्रीं चतुर्भुजेश्वर । हें महातीर्थ जाणिजे ॥ ३५ ॥ कपिलक्षेत्रीं व्याघ्रेश्वर । तैसा विहरातिरीं लिंगमंत्रेश्वर । तेथेंची भूताधिपेश्वर । जाणावा ॥ ३६ ॥ आरोग्यदाक्षेत्रीं आरोग्यदेश्वर । गौतमक्षेत्रीं गौतमेश्वर । महापातकातें जाळणार । महालिंगें जाणाहीं ॥ ३७ ॥ नारदक्षेत्रीं गाळितेश्वर । रत्नानदीतिरीं श्रीकंठेश्वर । तेथें आणिक रत्नेश्वर । षोडशशक्तिसहित ते ॥ ३८ ॥ व्याघ्र महाक्षेत्रीं पूतेश्वर । तेथेंच असें वासवेश्वर । भोग मोक्षाचा फळदातार । तयेस्थळीं जाणावा ॥ ३९ ॥ भीमक्षेत्रीं भीमेश्वर । करंकपावनक्षेत्रीं करकेश्वर । खंजनमुनिक्षेत्रीं खंजनेश्वर । वज्रकेतेश्वर तेथेंची असे ।

"Joint Project of the Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

॥ ४० ॥ कश्यपक्षेत्रीं कश्यपेश्वर । भैरवक्षेत्रीं भैरवेश्वर । तैसेच मोक्षेश्वर कामपाळेश्वर । चंद्रेश्वर आत्रि·
क्षेत्रीं ॥ ४१ ॥ धर्मक्षेत्रीं अर्धचंद्रेश्वर । जो सौभाग्याचा दातार । तेथें आणिक रत्नेश्वर । स्वस्तिकेश्वर ॥ १ ॥
॥ २ ॥ तयेस्थानीं ॥ ४२ ॥ कोटीश्वर नीळांबरक्षेत्रीं । भैरवेश्वर भैरवक्षेत्रीं । तेथें दर्शनें होय पवित्री । मोक्षेश्वर
दर्शनें ॥ ४३ ॥ आणिक तेथें भवमोचनेश्वर । त्यानंतरें अजपाळेश्वर । तेथें देवी एक वीरेचा पार ।
अगाध देखा ॥ ४४ ॥ राघवक्षेत्रीं रुद्रेश्वर । आणि तेथें दंडपाणीश्वर । तो कळीतें करीं अपहार । सत्य
जाणा ॥ ४५ ॥ अंबरीषक्षेत्रीं अंबरीषेश्वर । अश्वक्षेत्रीं कांतेश्वर । गंगामहातीर्थीं गुप्तेश्वर । लोमेश्वर
लोमतीर्थीं ॥ ४६ ॥ तापी उत्तर तीरीं विश्वेश्वर । तो महापापाते टाळणार । तेथें आणिक
कापाळिकेश्वर । पूर्वार्क महाक्षेत्रीं ॥४७ ॥ तेथें आणिक सौरेश्वर। तया जवळी नारदेश्वर । तैसा असे
सौवर्णेश्वर । तपनेश्वरतापिये स्थापिला ॥ ४८ ॥ कुरुक्षेत्रीं कौरवेश्वर । सोमक्षेत्रीं सोमेश्वर । तेथं
आणिक जनकेश्वर । शंखेश्वर ज्ञानदाता ॥ ४९ ॥ कुमुदक्षेत्रीं अटव्येश्वर । राघवक्षेत्रीं रामेश्वर ।
शतानीकक्षेत्रीं सिद्धेश्वर । तो पापहर जाणावा ॥ ५० ॥ त्रयस्त्रिंशत्क्षेत्रीं स्तेनेश्वर । त्यानंतर
पिंडेश्वर । दर्भांचा बहुसंचार । तेथें जाणा ॥ ५१ ॥ जरत्कार मुनिक्षेत्रीं नागेश्वर । तो ॥ २ ॥
महापातकांचा नाशकर । तपती संगमीं वासकर । राहिला तेथें ॥ ५२ ॥ तीन लिंगें पाताळबिळीं ।
तीं पातकें हरती सकळी । ही अष्टोत्तरी उच्चारी श्राद्धकाळीं । त्याचे पूर्वज अमृतपान करिती ॥ ५३ ॥
अपुत्री पुत्रवंत होती । निर्धनीधनातें लाभती । मोक्ष इच्छिति जे ते मुक्तीतें पावती । श्रद्धायुक्त

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

पठणें ॥ ५४ ॥ जे पठण करिती ही अष्टोत्तरी । नित्य स्नान केलिया नंतरी । त्यासी सर्व तिर्थांचे सुकृत अवधारी । येथें नाहीं संदेह ॥ ५५ ॥ उपदेश लोमेशाचा । गोकर्ण पुत्र खंजनाचा । मुनी पुढें महात्म्य बोले वाचा । सूर्य तनयेचें ॥ ५६ ॥ मुनयउचुः । गोकर्णा मुनी पुसती विनवूनि । तुह्मी गोकर्णनाम पावले कैसेनि । हें सांगावें कृपाकरूनि । आह्मालागी ॥ ५७ ॥ गोकर्णउवाच । हें भानुजा महात्म्य भूमीच्याठायीं सांगितलें । ह्मणोनि समस्त जगतीश्रीं गोकर्णनाम ठेविलें । हेंचि नामासि कारण जालें । मुनि पुंगवा ऐसें ॥ ५८ ॥ अश्वमेध सहस्त्रीं जे गती । स्वर्गलोकासी नाहीं प्राप्ती । तापीमहात्म्य ऐकतां ते गती । होईल प्राणियासी ॥ ५९ ॥ गंगागयादी तीर्थें स्नानदानीं । जें फळ पावती सकळ प्राणी । तें फळ ऐकोनी श्रवणीं । तापीमहात्म्यातें ॥ ६० ॥ ही अष्टोत्तरी जे पढती । आणि जे एकचित्तें ऐकती । त्यांची कोटीकुळें उद्धरती । ते पावती विष्णुपदातें ॥ ६१ ॥ इतिश्री स्कंदपुराणें तापीमहात्म्य लिंगाष्टोत्तरी वर्णनंनाम प्रथमोध्यायः । श्रीशंकरार्पणमस्तु । श्रीरस्तु । शुभंभवतु ॥ ॥ ॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीगणेशायनमः । श्रीगुरुदत्तात्रयायनमः । भावयुक्त अवघे मुनी । तापीमहात्म्यातें ऐकोनी ।
त्या मुनि मुख्या गोकर्णी । पुसते जाले ॥ १ ॥ मुनयऊचुः । अगा हे गोकर्णा । ह्या तापीची नाम
वर्णना । कल्पाकल्पाची भिन्नाभिन्ना । सांगा आह्मासी ॥ २ ॥ गोकर्ण उवाच । ऐकावेंजी सकळ मुनी ।
गौप्याहूनि गौप्य जाणी । एकवीस नांवें नानावर्णी । श्रीतपतीचीं ऐकावीं ॥ ३ ॥ हीं नामें उच्चारिती
जे प्राणी । त्यांचीं कोटी कुळें उद्धरोनी । परमपदाचे स्थानीं । पावती सत्य ॥ ४ ॥ प्रथम सत्या दुसरें
सत्योद्भवाबरवें । तिसरें श्यामा चौथें कपिला जाणावें । काशिशांबिका पांचवें तापिनी तें सहावें । आणि तपन-
ऱ्हदा सातवेंतें ॥५॥ नासत्या आठवें । मासिकोद्भवा नववें । सावित्री तें दहावें । आणि अकरावें तें सहस्त्रकरा
॥६॥ सनका तें बारावें । अमृतवाहिनी तें तेरावें । सुषुम्ना तें चौदावें । नाम हीचें जाणीजे ॥ ७ ॥ सूक्ष्मरमणा
पंधरावें । सर्पासर्पविषापहा सोळावें । तिग्मानाम सतरावें । अठरावें तिग्मरसा ॥ ८ ॥ तारानाम एकोणीसावें
ताम्रानाम विसावें । तापीनाम एकविसावें । पुढें नांवें ऐका कल्पाचीं ॥ ९ ॥ पद्मकपौष्कर सौर ।
शांभव काश्यपेय उपेंद्र । ऐंद्रवारुणमहाबळ कल्पांतर । महेशान आणि तें चांद्र जाणा ॥ १० ॥ नकुळाक्ष
कुळांतक । श्रीकृत मत्स्यकाळाख्य । कुर्मवाराह आदिवाराहक । आणि कृष्णवाराहक तें ॥ ११ ॥
श्वेतवाराह कल्पजाणावें । कलियुग वर्तत मानावें । श्रोतीं जनीं निश्चयावें । हें सत्यवचन ॥ १२ ॥
पद्मकल्पीं सत्या जाणावी । पुष्कर कल्पीं सत्योद्भवा लेखावी । सौरकल्पीं श्यामा ह्मणावी । शांभवकल्पीं
कपिला ॥ १३ ॥ चांद्रकल्पीं अंबिका ह्मणती । काश्यपकल्पीं तापनी बोलती । उपेंद्रकल्पीं तपनोद्भवा



Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

लेखिती । ऐंद्रकल्पीं नासत्या ॥ १४ ॥ वारुणकल्पीं नासिकोद्भवा जाणावी । महाब्रह्मकल्पीं सावित्री गणावी । महेशान कल्पीं सहस्त्रकरा ह्मणावी । नकुळाक्षकल्पीं सनका ॥ १५ ॥ कुळांतककल्पीं अमृत स्रवणी । श्रीकृतकल्पीं सुषुम्ना जाणी । मत्स्यकल्पीं सूक्ष्मरमणा मानी । काळाख्यकल्पीं सर्पविषा पहा ॥ १६ ॥ कूर्माख्यकल्पीं तिग्मा नांवें । वाराहकल्पीं तिग्मरया जाणावें । आदिवाराहकल्पीं तारा ह्मणावें । येणें परी ॥ १७ ॥ कृष्णवाराह कल्पीं तांम्रा नांवें । श्वेतवाराहीं तापी ह्मणावें । एकवीस कल्पांचीं एकवीस नांवें । हीं स्मरावीं सर्वदां ॥ १८ ॥ प्रातःस्नानीं जे ह्मणती । त्यांचे एकवीस पूर्वज उद्धरती । सहस्त्र जन्मांचीं पापें भस्म होतीं । ऐकती त्यासी हेंची फळ ॥ १९ ॥ ॥ इतिश्रीस्कंद-पुराणे तापीमाहात्म्ये एकविसकल्प नामावळी कथनंन्नाम द्वितियोध्यायः ॥ २ ॥ श्रीहरीहरार्पणमस्तु ॥

Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

श्रीगणेशायनमः । गोकर्ण उवाच । जिचें आश्रमीं मुनि जाण । पाप कर्मा करितीनिर्दळण।
सुरा सुरीं सेव्यमान । ऐसी हे अर्कजा मज पवित्रकरो ॥ १ ॥ कोणेएके अवसरीं । कैलासगिरी
शिखरीं । उमेसहित बैसले त्रिपुरारी । आनंदेसी ॥ २ ॥ वैराग्ययुक्त अंतःकरण । एकनिष्ठ हो उनी
जाण । पुसताजाला षडानन । तापीमाहात्म्य ॥ ३ ॥ समस्त गंगामहत्म्यातें सांगितलें । सकळ
मुनि मिळोन बोलिले । परी भानुसुतेचें माहात्म्य नाहीं ऐकिलें । तरी ही काय आतां जाहली ॥ ४ ॥
श्रीरुद्रउवाच । इचें माहात्म्य पूर्वी होतें थोरी । नारदासी म्यां सांगितलें चोरी । मग गंगा येईल
पृथ्वीवरी । म्हणोनीयां ॥ ५ ॥ जैं गंगा शरयू नव्हती । रेवा गोमती साभ्रमती । नव्हता
ब्रह्मासृष्टी आकारवंती । तेव्हां जागिली ही तापी ॥ ६ ॥ गंगा स्नानें पवित्र करी । रेवा दर्शनें
पापहरी। सरस्वती जळपानेंउद्धरी। तापी करी स्मरणें पवित्रता ॥ ७ ॥ आदित्य शरीरापासून जन्मली ।
सुमेरुश्रृंगा होऊन उतरली । धर्मरेखेसारिखी मिरविली । ऐसी ही अनादिसरिता ॥ ८ ॥ इशीं ज्या सरिता
मिळाल्या । त्या इनें पवित्र केल्या । समुद्र ही कृतार्थ झाला । हे दुर्लभ पातक्यांसी ॥ ९ ॥
स्कंदउवाच । अगा हे ताता । समस्ता आदि कैसी जन्मली हे सारिता । नव्हता जैं विश्वकर्ता । तैं
सूर्यकैंचा ॥ १० ॥ श्रीरुद्रउवाच । ब्रह्मा नाभीहून उपजला । अंधकार समस्त देखता झाला ।
मग सृष्टि रचनेतें इच्छूं लागला । तेव्हां जन्मला हा सूर्य ॥ ११ ॥ सकळ अंधकार निवारण ।
उपजला सूर्य नारायण । तेजें तापला ब्रह्माजाणून । चिंताग्रस्त जाला ॥ १२ ॥ मग सूर्य नारायणें



Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai Joint project of the

रचिली हे तापी । ब्रम्ह्मासी शीतळ करूनी उद्धरिंले पापी । पुण्याची आपारवापी । आणिली मृत्यु
लोकासीं ॥ १३ ॥ स्कंदउवाच । महादेवाप्रती षडानन बोलिले । तापीमहात्म्यनारदानें हरिलें । तुमच्या
आज्ञेनें केलें । अनुचित कर्म कासया ॥ १४ ॥ माहादेवउवाच । मग सुतासी शिव बोलिला । तुझें
वचनीं मज हर्ष जाहला । आतां पूर्वी वर्तलें तें तुजला । सांगो गुज ॥ १५ ॥ सगरपुत्र
उद्धरावया कारणें । भगीरथें थोर तप करणें । भागिरथी तुवां येणें । मृत्यु लोकासीं ॥ १६ ॥
। गंगाउवाच । मग गंगा बोलिली । तुज मी प्रसन्न झालीं । परी मृत्युलोका मी वहिली । नये जाण
॥ १७ ॥ तापी माहात्म्याची महिमा थोर । मन हे न मानिती अनेश्वर । मग नारदाप्रती सत्वर ।
शरण गेला भगीरथ ॥ १८ ॥ मग नारदें तापीचें तप करोनी । नानापरी प्रार्थूनी । महात्य द्यावें
मजलागूनी । पठण कीर्तन करावया ॥ १९ ॥ नारदें महात्म्य हरिलें । शिव ह्मणे पुत्रा तुझेनि
मजला स्मरलें । तें मी तुजला कथीन वहिलें । भूलोकासी मंगळ ॥२०॥ पुत्रा ऐक आतां रामक्षेत्र ।
पतित होती पवित्र । ज्ञान होय ह्मणोन सांगती त्रिनेत्र । पूर्वज उद्धरती॥२१॥ जे येथें करिती पिंडदान
कन्यार्की शमीपत्रप्रमाण । ते होती मातेचें उत्तीर्ण । ब्रह्मपदअंतीं पावती ॥ २२ ॥ आणिक
आश्चर्य देखिलें । पुत्रेविण पतित उद्धरले । सुत्हद मित्रें तर्पिलें । हें नवल दुजे तिर्थी नाहीं ॥२३ ॥
महा पातकातें नाशिनी । प्राणिया सर्व उद्धरणी । पातकिया दुर्लभ जाणी । ऐसी हे तापी सारिता
॥ २४ ॥ कन्यागतीं सूर्य ग्रहणीं । देवांसही दुर्लभ पर्वणी । मनुष्य केवीं पावती जाणी । हें सत्य

मानावें ॥ २५ ॥ प्रयागीं वर्ष एक स्नान करिती । तें पुण्य रामेश्वरीं एक पक्षातें पावती । जरी
॥ १ ॥ कन्यागतीं सेविती । एक दिवस ॥ २६ ॥ उत्तर क्रिया दशरथाची । रामें केली वन फळांची ।
सनंदन प्रसादें साची । येथें रामक्षेत्रीं ॥ २७ ॥ पुत्रें स्नान करावें । आपलें वस्त्र पिळावें । तेणेंची
पूर्वज तृप्तिपावे । तर्पण श्राद्धाविण ॥ २८ ॥ कृतायुगीं दाक्षायणी । वन्हीं घातला आत्मघातनीं ।
ती प्रेतत्वातें येतांक्षणीं । येथें शिवतर्पणें उद्धरली ॥२९॥ तेव्हां झाली गगनवाणी । मी होईन हिमाचळनं-
दिनी । इयेचे उदक तर्पणें करूनि । प्रेतभाव गेला माझा ॥ ३० ॥ गिरिजा संगमीं रामेश्वर जाणावा ।
हा दुर्लभ प्राणिया सर्वां । पुत्री हत्या विमोचन भावा । दक्षप्रजापती पावला ॥ ३१ ॥ गिरिजा आणि
तापीसंगमी जाण । अर्क कन्यागतीं करिती स्नान । ते योगसांख्यावांचून । पावती परमपद ॥ ३२ ॥
आणिक तीर्थी यज्ञांती ज्ञान । येथें प्रातक्यासी स्नान । ते होतील पावन । पावती सद्गती ॥ ३३ ॥
अर्जुनें बाणप्रक्षाळिले । त्या नदीसी अर्जुना नांव झालें । पार्थें गाईसी वळवून नेलें । वैराट नगरीं ।
३४ ॥ तेही अर्जुना नदी झाली । तापी गिरिजा संगमीं मिळाली । सकळ ती पाप हरिती झाली । विश्व
जनांचें॥ ३५ ॥ हें तीर्थ अलौकीक । सर्वांसी मुक्तिदायक । उद्धरले येथें जयकेतादिक । दौहित्रें तर्पिल्या
॥ ३६ ॥ स्कंदउवाच । अहो ताता मी आहे संशयाचित्त । विस्मय मज फार वाटत । दौहित्रें कैसा ॥ ९ ॥
उद्धरिला जयकेत । हें सांगावें सविस्तरें ॥ ३७ ॥ श्रीरुद्रउवाच । कान्यकुब्जदेशीं महोदया नगरी ।
तेथें जयकेतू राज्यकरी । प्रजेचें पाळन बहुतांपरी करी परमार्थी धार्मिक ॥ ३८ ॥ तो

12

दाता द्विजभक्त । प्रजेचे हितीं वर्तत । गो भूमी हिरण्यरत्नें देत । कुरुक्षेत्रीं ।द्विजवरां ॥ ॥ ३९ ॥ रात्रंदिवस सत्र चालवित । पुत्रकामने शिव आराधित । ब्राह्मण हस्तें यज्ञ करवित । ऐसा पुण्य शीलतो ॥ ४० ॥ त्यासी शिव प्रसन्न झाला । वर मागह्मणें वहिला । तेणें वर मागितला । देईं पुत्र मजलागीं ॥ ४१ ॥ रुद्रउवाच । अगा हे राया । तुज पुत्र नाहीं निश्चया । तुज होईल जाणतनया । प्राप्तकाळीं ॥ ४२ ॥ शुभ सुकर्माचें निदान । हे सत्य करूनि जाण । तुज येक पुत्री निर्वाण । होईल आतां ॥ ४३ ॥ आपुलें कर्म सफळ । जाणोनि तो निश्चळ । नगरीं आला तात्काळ । आनंदेसीं ॥ ४४ ॥ स्त्रियेसी सांगितलें गुज । एक कन्या होईल तुज । मग ती गार्भिणि झाली राजभाज । कन्यारत्न प्रसवली ॥ ४५ ॥ पुत्राहून ती कन्या फार । तिचा लळा पाळती अपार । रुपवंती अती मनोहर । तिचें नांव प्रभा ॥ ४६ ॥ ती अरालपक्ष्म नयन । पावली नवयौवन । विराटदेशीं शूरसेन । जाण राजा होता ॥ ४७ ॥ त्याचा पुत्र वीरसेन । त्यासी दिधली तनया। जाण । तीस झाले पुत्रजनन । राज्य पालन करी ऐसा ॥ ४८ ॥ तियेसी पुत्र जाला ऐकूनी । जयकेतु हर्ष मानून मनीं । मी पुत्रवंत ऐसें जाणूनी । निवृत्तीतें पावला ॥ ४९ ॥ पुत्रनामें सत्यसिंध । तो झाला प्रौढप्रासिद्ध । मग जयकेतूस जाला कालबंध । गेला स्वर्गी ॥ ५० ॥ तो कर्मबंधे अंतराळीं राहिला । यमदूतां देखता झाला । महा भयातें पावला । अतिक्रूर देखोनी ॥ ५१ ॥ मषीवर्ण त्यांची तनु । पक्षीवत देखिली हनु । तव अगास्ति आश्रम जाणून । शरणांगत झाला तया ॥ ५२ ॥ मुनेश्वराते

"Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai"

नमून । बोलता जाला वचन । मुनिश्रेष्टा काय कारण । मज पुढें यमदूत येती ॥ ५३ ॥ ते विक्राळ
क्रूर वदन । स्थूलदंत ते अति भीषण । क्रूर पिंगळ लोचन । येताती पुढें ॥ ५४ ॥ सदैव भेड-
साऊन बोलताती । अधर कंपित कारिताती । वेगे कारितात गती । ऐसे हे यमदूत ॥ ५५ ॥ अगस्ती
उवाच । अगा राया तूं पुण्यवंत । तुवां दिधलीं दानें बहुत । आणिक केलें सुकृत । दुजा नाहीं
तुजसमान ॥ ५६ ॥ तूं नाहीं पुत्रवंत । म्हणोनि दिसतात यमदूत । पुन्नामनरकीं दृष्टांत । दावितील
तुज ॥ ५७ ॥ जो मनुष्य पुत्रहीन । तया पुन्नाम नरकीं होय मज्जन । परी तूं पुण्यवंत म्हणोन ।
तुज समीप ठेविती ॥ ५८ ॥ तुज तंवपर्यंत ठेवितील । जै दौहित्र रामक्षेत्रीं जाईल । तेणें पुण्यें
विमान येईल । तुज न्यावया राया ॥ ५९ ॥ देव पुष्पें वर्षतील । आतां जाई धर्माजवळ । मानूनी
अगस्तीचे बोल । गेला धर्मानिकट ॥ ६० ॥ त्याचे द्वारीं श्वान दोन । ते विक्राळ वदन ।
त्यांचे श्याम शबलवर्ण । तें देखता जाला ॥ ६१ ॥ त्यांची जिव्हा दंतांतळीं । त्यांचे
लोचन क्रूर पिंगळी । तिहीं पुच्छें हालविलीं । ते स्वामीतो नमिला ॥ ६२ ॥ तो राजा
पुण्य पावन । त्यानें दिलें होतें महादान । नारी समुह जाण । देखता झाला ॥ ६३ ॥
नारी कुंभ भरोनिया । जलपान करीती राया । जळ प्रवाह अद्यापि चाललिया । तेणें पुण्यें
॥ ६४ ॥ तुवां अन्न दान केलें । तें येथें भांडार भरलें । षड्रस भोजन वाहिलें । करी तूं आतां ॥ ६५ ॥
एक अन्नें पुरविती । एक जलपान करविती । एक पुष्पांतें अर्पिती । एक अंग भोग ॥ ६६ ॥ ते समयीं

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

14

धर्मराज आला । त्यापरी तो राजा देखिला । राया नरकासमीप चला । ऐसें बोले यमराज ॥ ६७ ॥
मग तो धरून हातीं । बैसविला नरकाप्रती । अवघे जन नरकी पचती । तो देखता झाला ॥ ६८ ॥
त्यांतें यमदूत ताडित । त्रुडिया वारंवार देत । राव झाला दयावंत । दूताप्रती बोलिला ॥ ६९ ॥
मज येथें घालावें । जिवांसी विश्रांती तें घ्यावें । इतके उपकार करावे । मज कारणें तुम्हीं ॥ ७० ॥
दूतउवाच । तुवां पुण्य भलें केलें । मग उत्तम स्थळीं ठेविलें । इहीं पातका केलें । म्हणोनि घातले
नरकीं ॥ ७१ ॥ राजोवाच । दुतांनो तुम्ही यांसी न सोडा । तरी यासी नका ताडा । हे दीन आ-
क्रंदत पावती पिडा । माझी विनंती ऐका ॥ ७२ ॥ ऐसें राजानें आज्ञापिलें । त्यावरी दूतें न ताडिलें ।
मग राजया अन्न आलें । प्रतिदिनीं तयां देत असे ॥ ७३ ॥ मग राजाचा दौहित्र सत्यसिंधु । तो
षोडष वर्षांचा मति अगाधु । तो मृगया गेला प्रसिद्ध । अल्प पायदळेंसीं ॥ ७४ ॥ तो राजा श्रद्धावंत
दानीं । प्रवेशला थोर काननीं । भ्रमण करिता ते स्थानीं । वटवृक्ष देखिला ॥ ७५ ॥ तया स्थळीं
देखिले महामुनी । गर्गअंगिरा कुत्ससुमंत, जैमिनी । वटवृक्षीं विसावले जाणी । त्यांतें नमिलें रायें
॥ ७६ ॥ अश्वातळीं उतरोनी । पृथ्वीवरी लोटांगणें घालूनी । त्यांचें चरण वंदूनी । बैसला तेथें ॥७७॥
मुनीं हीं आशिर्वाद दिधला । चिरंजीव होईं वहिला । मुनीनीं आदरें बसविला । समीप भागीं ॥ ७८॥
राजा ऋषींतें पुसत । या वनीं कवण कार्या वसत । मुनी तया उत्तर देत । आदरेंसीं ॥ ७९ ॥
राया आम्हीं यातेस जात । वेळ योग अत्यंत । होत जैं सूर्यकन्यागत । भास्कर पर्वी ॥ ८० ॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

॥ राजोवाच । हें पर्व पूर्वीं ब्राह्मणें सांगितलें । परी तुम्ही कोण तीर्थां चाललेत । कृपा करूनि पाहिजे
सांगितले । ते स्थळीं जाईन मी ॥८१॥ आपण गंगा नैमिष्यारण्यीं जाल । कीं कुरुक्षेत्र पुष्कर पाताल।
किंवा द्वारका अयोध्या गमन कराल । कीं वाराणसी ॥ ८२ ॥ गर्गउवाच । राजपुत्रा प्रयागसंगमीं
न जावें । गंगे जाऊनि काय करावें । रामक्षेत्रीं जावें । जें कन्यागत रवी ॥ ८३ ॥ अंगिराउवाच ॥
सूर्य पर्वी कन्यागत । तें व्हावें रामेश्वराश्रित । तेथें येती तीर्थें समस्त । उत्तम तीर्थ हें ॥ ८४ ॥ कु-
त्सउवाच । सर्व तीर्थांचें तीर्थराज । तापी तट नवल चोज । कन्यागतीं दुर्लभ सहज। विशेष सूर्यपर्वीं
॥ ८५ ॥ सुमंतउवाच । जैं सूर्य कन्यागत । भावें अभावें सेवित । एकवीस कुळांतें तारि
त । नानाप्रकारे प्राणिया ॥ ८६ ॥जैमिनिरुवाच । आम्हीं नैमिषाहून येथें जातों । ज्ञानचक्षूं हीं
पाहतो । तरी आणिक तीर्थें न देखतों। रामेश्वरासमान ॥ ८७ ॥ ऐसें मुनींहीं सांगितलें । राजानें
रामेश्वरीं मन प्रेरिलें । विश्रांती घेऊन उदक घेतलें । मग शिघ्र घरासी आला ॥८८॥ अनंतवित्त घेऊनी।
ब्राह्मणासि पाचारूनी । राम तीर्था रवीपर्वीं जाऊनी । स्नान केलें ॥ ८९ ॥ मग दिधलीं ना-
नादानें । दिधलीं गो भू हिरण्य रत्नें । आणिक केलीं अन्न दानें । रात्रंदिवस तेणें ॥ ९० ॥
ह्या कर्म विपाकें करून । तेथें आले देवगण । घेऊन रत्नजडित विमान । जय केतु समीप ॥९१॥
तींहीं जय केतु देखिला । पुन्नामनरकासमीप बैसला । यमदूतीं पाहिला । सकळ प्राण्यांसहीत तो
॥ ९२ ॥ यमदूतउवाच । अगाहो महिपतो । बैसा सूर्य तेज विमानाप्रती । तुम्हा दिधलें पद अना-



Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

वृत्तां । दौहित्राचे बळें ॥ ९३ ॥ राजोवाच । देवदूता मी नये येथूनी । या पाप कर्मियां सांडूनी ।
बहु दिसांचे सहवासानी । कृपा बहु उपजे ॥ ९४ ॥ आणिक तुम्हा सांगत । मी येथेंच राहत ।
पतिता न्यावे देवदूत । ही सत्य वाचा ॥ ९५ ॥ यमदूतउवाच । राया तुज जाऊं देणें । आणि यासी
न सोडणें । अपुत्रासी भोगवणें । आमुचे गृह ॥ ९६ ॥ देवदूतउवाच । पुत्राहून दौहित्र अधिक ।
ज्यासी आदर करी अंतक । त्यासी देवविणा नरक । इंद्रासामर्थ्य नाहीं॥२७॥ अश्वमेध पुण्य होय जिचे
संतती । त्रैलोक्य जिचेने उद्धरती । बळात्कारें धर्म करविती । ऐसी पुत्री पुत्राधिक ॥ ९८ ॥ या
दौहित्रें सम्यक । रामतीर्थी गेला तो एक । त्यानें केलीं दानें अनेक । स्नानें करूनी सूर्य पर्वी ॥ ९९ ॥
तेणें पुण्य प्रभावें । विष्णुपदा त्यानें जावें । यमदूत पुसती याचें पुण्य सांगावें । आणि पातक कायसे
॥ १०० ॥ देवदूतउवाच । याचे पुण्य प्रभावें हे पापी उद्धरतील । देवदूतांचा ऐकूनि बोल । हें
श्रवण करूनि रायें सुशिळ । अर्ध पुण्य यातें उद्धरावें ॥ १०१ ॥ ऐसा भूपाळ बोलिला ।
यमदूतातें संतोष झाला । त्यांचा भवपाश तुटला । दिव्यदेह झाले पातकी ॥ १०२ ॥ यमदूतां निवारून
स्वर्गा गेला पापी जन । देवदूतीं राजा विमानीं बैसवून । नेला ब्रह्म भुवनी ॥ १०३ ॥ ऐसें
रामेश्वराचें महिमान । श्रवण करिती श्रद्धेकरून । जे अश्वमेधीं होय पुण्य । तें पावती निभ्रांत ॥१०४॥
जो रामेश्वरा भजेल । जैं सूर्य कन्यागत होईल । तो निःशंक उद्धरेल । कुळकोटीशतेंसी ॥ १०५ ॥
जो ये स्थळीं मृत्यु पावेल । नेमें सुकृतें आचरेल । तो ज्योतीर्मय होईल । पावेल विष्णुपदीं ॥ १०६ ॥

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

श्रीरामें येथें मृण्मय पिंड ठेविला । तो देवपणातें पावला । लक्ष्मणें दोहोकरी रोपिला । तें हें रामेश्वर लिंग ॥ १०७ ॥ त्या दिवसापासून । रामेश्वराचें महिमान । त्याचें झालिया दर्शन । स्वर्गातें पितर पावती ॥ १०८ ॥ इतिश्रीस्कंदपुराणे तापीमाहात्मे रामेश्वरलिंग नाम वर्णनंसहित क्षेत्रप्रभाव महिमावर्णनं नाम तृतीयोध्यायः ॥ ॥ ॥ ॥ ॥



Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

श्रीगणेशायनमः ॥श्रीशाहादत्तआळमाप्रमेवेनमः ॥ गोकर्णउवाच ॥ तापी तटीं क्षेत्र सुंदर । महाऋषी
करिती उच्चार । जीचा उद्भव वराह शरीर । तीं पयोष्णी तापीसह येथें ॥ १ ॥ सत्यजितें कामधेनू
आराधिली । ती त्यासी प्रसन्न झाली । पितामहें जी सेविली । तें हें तापीचें सुंदर तीर्थ ॥ २ ॥
यासमानं नाहीं द्वारका उज्जनी । काशी गया नाहीं समानी । पूर्वज तर्पिले ज्यानें ह्या जळेंकरूनी ।
ते न इच्छिती पिंडातें ॥ ३ ॥ स्नान करूनी वस्त्र पिळिती । त्याचे अल्पबिंदू पडती । ते पूर्वजा
आमृतसम होती । निभ्रांत जाणा॥४॥गोत्रीं उपजोनी जे अंजुळी देती । त्यांचे पूर्वज उद्धरती । त्यांसी
यमगण न पहाती । किंचिन्मात्र ॥ ५ ॥ जिहीं दुष्टपातकें केलीं असती । त्यांतें ब्रह्मलोकीं वस्ती ।
ते कृमिदेह देथें टाकिती । पावती ब्रह्मपद ॥ ६ ॥ येथें पक्षी उलूक श्वान । जंबुकादि पावती मरण ।
त्यांच्या अस्थि जोंवरी जाण । तोंवरी स्वर्ग भोग भोगिती ॥ ७ ॥ द्वादश वेळ गोदेसी जाईजे ।
कुरुक्षेत्रीं भूदान देईजे । सहामास गया सेविजे । तें समान नव्हे। पद्मकाशी ॥ ८ ॥ शुक्लपक्षीं आ-
षाढ मासीं । जो साधील पद्मकाशी । त्यासी चाड नाहीं सकळ तीर्थासी । हें सत्यवचन जाणा ॥ ९ ॥
अमा येई सोमवारीं । तैसी सप्तमी भानुवारीं । आणि चतुर्थी भौमवासरीं । तें पद्मक पर्व जाणा ॥१०॥
स्कंदउवाच ॥ आषाढ मासीं पद्मकाचें । विशेष बोलिले महात्म्य साचे । कारण सांगावें त्याचें ।
विशेषें करूनी ॥ ११ ॥ शिवउवाच ॥ शुक्लपक्षीं आषाढमासीं । पद्मक पर्वीं जन्म तापीसी ।
दुर्लभ सर्व लोकांसी । हें पद्मक आषाढीं ॥ १२ ॥ पर्व साधन ऐकावें । प्रथम स्नान करावें । क्षीर

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

मोजन विप्रा द्यावें । पुजावे द्वादशार्क ॥ १३ ॥ वस्त्रें द्यावीं द्विजजनां । स्वजनासह करावें मोजना । ऐसेंमान-
वें करितां जाणा । शुद्धात्मा होय तात्काळ ॥ १४ ॥ येथें करावा होम तिळ जव । रवी संतोषास्तव ।
द्विजा दानें द्यावीं श्रद्धाभाव । तें होय अक्षय ॥ १५ ॥ फळ पुष्प वस्त्र कुंभ द्यावे । भक्ष्य भोज्य म-
नोहर अर्पावें । स्त्रीयुक्त ब्राह्मणातें पूजावें । पद्मकपर्वीं तें अक्षय ।१६। वंश पात्रावरी सप्तधान्य ठेऊन । त्यासी
वस्त्रानें वेष्टून । तेथें दक्षणासहित फळ ठेवून । येणें मंत्रें अर्घ्य द्यावा ॥ १६ ॥ श्लोक ॥ तपनात्वं समुद्भूते
तापने पाप नाशिनि । गृहाणार्घ्यं मया दत्तं आषाढे जन्म संभवे ॥१७॥ टीका । तपनापासून तव
उद्भव । तापनी ऐसें तुझें नांव । आषाढ शुद्ध सप्तमी जन्म संभव । पाप नाशनीं मम अर्घ्य वेईं ॥ १८ ॥
एक भुक्त अथवा नक्त करावें । विशेषें उपवासी असावें । भक्तियुक्त जागरण करावें । सप्तमीसी तें
अक्षय ॥ १९ ॥ मनुष्य देहीं तंववरी । पापगर्जनेतें करी । क्षणार्धंही सेविले जरी । आषाढीं भानु-
जाजळ ॥ २० ॥ आषाढाची थोरी । माघ कार्तिक न पावती सरी । तें ब्रह्मा सृष्टी रचना करी ।
नाम पावला विश्वकर्मा ॥ २१ ॥ विष्णु जेथें शयन करी । योगनिद्रा पावे शरीरीं । लक्ष्मी सवें
संयोग करी । जनार्दन जगत्पति ॥ २२ ॥ आषाढीं जें होमिलें । सूर्य देहा समीप जें
जें दिधलें । अन्नदान जें केलें । तें सर्व अक्षय ॥ २३ ॥ प्रयागीं माघ मासीं जो न्हाईल । त्याचें
होईल जें फळ । तें आषाढीं तापी सेवितां पाविजेल । हें सत्य जाणावें ॥ २४ ॥ जो तापला श्रमें
करून । जो मनुष्य होय श्रद्धा हीन । तो अषाढीं करितां स्नान । पाप मुक्त होईल ॥ २५ ॥ जो

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---


**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**

राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)

**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८

**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com